प्रेसनोट दि.२७/०७/२०१९

जेस्सी ब्युटी प्रा.लिमिटेड हॉटेल करोलबागचे वर, मेडीपॉईंट हॉस्पीटलचे जवळ न्यु डी.पी.रोड बाणेर पुणे येथे छापा, परराज्यातील २ व आळंदी पुणे येथील १ मुलींची वेश्या व्यवसायातुन सुटका, स्पा मसाज सेटर चालक पुरुष अटकेत.

---

मंगळवार दिनांक २३/०७/२०१९ रोजी सामाजीक सुरक्षा विभाग, गुन्हे शाखेकडील पोलीस निरीक्षक, वैशाली चांदगुडे यांचेकडुन माहिती मिळाली की, 'जेसी प्रायव्हेट लिमीटेड,' स्पा ॲण्ड सलुन मसाज सेंटर, ओंध रोड, येथील स्पा मसाज सेंटरमध्ये बाबत खातरजमा करुन तेथे छापा टाकला. सदरचे छाप्या दरम्यान २ मेघालयीन २१ वर्षीय मुली व १ महाराष्ट्रीयन मुलगी अशा एकुण ३ सज्ञान महिलांची वेश्याव्यवसायातुन सुटका करुन वेश्या व्यवसायास लावणारा पुरुष नामे चो संग गेउन, रा.साउथ कोरिया यांचे विरुध्द चतुश्रृंगी पोलीस स्टेशन गु.र.नं. ६६३/२०१९, अनैतीक मानवी वाहतुक प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ३,४,५,७(२)(ख) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. आरोपी यास कारवाईचे वेळी ताब्यात घेण्यात आलेले आहे.

कारवाईचे वेळी रोख रु. ७५००/- रु., मोबाईल फोन व इतर मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. तसेच या गुन्हयातील पिडीत मुलींना रेस्क्यु होम महंमदवाडी, हडपसर येथे संरक्षणकामी ठेवण्यात आलेले आहे.

वरील नमुद कारवाई ही मा. पोलीस उप आयुक्त गुन्हे, बच्चन सिंह, सपोआ, गुन्हे-२, भानुप्रताप बर्गे, यांचे मार्गदर्शना खाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वैशाली चांदगुडे सपोफौ एन.व्ही.झांजरे, सपोफौ, पी.मोकाशी, पोहवा. ५६७४ पी.व्ही.मगर, मपोहवा १०८२ जाधव, मपोना ९५७३ बारसकर, पोना ६९४६ आर.एस.वंजारी, पोना.६९४२ जाधव व चतुश्रृंगी पोलीस स्टेशनकडील पोलीस निरीक्षक, वैशाली गलांडे व त्यांचे स्टाफसह संयुक्तीक कारवाई केली आहे.

Chandgude